# PET -८ प्रवेश प्रक्रीयेच्या महत्वाच्या सूचना

- पेट-८ प्रवेश प्रक्रियेमधील ३० गुणांच्या मौखिक परिक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.
- रिक्त जागेच्या १:३ या प्रमाणात पात्र विषयनिहाय विद्यार्थ्यांची यादी संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
- पेट-८ प्रवेश लेखी परीक्षेत सर्वसाधारण प्रवर्गातून ७० पैकी ३५ गुण व राखीव प्रवर्गातून ७० पैकी ३२ गुण प्राप्त झालेल्या व १:३ या रिक्त जागेच्या प्रमाणात संख्येनुसार मौखिक परीक्षेस विद्यार्थी पात्र झाले आहेत.
- रिक्त जागेच्या १:३ प्रमाणे विषयाची गुणवत्ता यादी तयार करताना जर एखादया विद्यार्थ्याचे समान गुण आले असतील तर अशा वेळी त्या विद्यार्थ्याच्या PG च्या गुणांचा विचार करुन यादीत समावेश करण्यात आला आहे.
- पेट-८ प्रवेश प्रक्रिये संदर्भात संबधिंत विद्यार्थ्यांनी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळास भेट देऊन अद्यावत माहिती घ्यावी.
- मौखिक परिक्षेकरिता विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळेच्या अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- मौखिक परिक्षा या प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संकुलामध्ये आयोजित केल्या जातील.
- मौखिक परिक्षेकरिता विद्यार्थ्यांनी स्वत:च्या (छायाचित्र असलेला) (Photo identity )ओळखपत्रासह प्रत्यक्षात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
- मौखिक परिक्षेकरिता विद्यार्थी अनुपस्थित राहिला तर तो विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमधून बाद होईल.
- विद्यार्थ्यांनी मौखिक परिक्षेकरिता येताना सर्व मुळकागदपत्रे व त्यांच्या दोन संचामध्ये छायांकित (Photo copy) प्रती घेऊन यावेत.
- विद्यार्थ्यांना मौखिक परिक्षेबाबतची सर्व सूचना ई-मेल द्वारे,एस,एम,एस (SMS) द्वारे कळविले जाईल. तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केले जाईल.

- विद्यार्थ्यांनी पेट पूर्व परीक्षा अर्ज सादर करत असताना दिलेल्या ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांकावरतीच ई-मेल द्वारे व एस.एम.एस द्वारे पाठविण्यात येईल. दिलेला भ्रमणध्वनी नंबर किंवा ई-मेल आयडी चुकीचा असल्यास प्रवेशाबाबत ई-मेल अथवा SMS द्वारे होणाऱ्या पत्रव्यवहार झाला नाही तर विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
- विद्यार्थ्यांनी मौखिक परिक्षेकरिता उपस्थित राहताना Check List व Input Sheet सह उपस्थित राहावे.(सोबत सहपत्र १ व २)
- मौखिक परिक्षेकरिता जाहिर करण्यात आलेल्या वेळापत्रकात काही तांत्रिक कारणास्तव बदल करण्याचा सर्व अधिकार विद्यापीठाचा आहे.
- मौखिक परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यार्थ्याची कुठलीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.
- मागास प्रवर्गातील उमेदवारांची गुणानुक्रमे जर खुल्या प्रवर्गाच्या यादीमध्येही नाव असेल अशा उमेदवारांची मौखिक परीक्षा एकदाच खुल्या प्रवर्गाच्या वेळी घेण्यात येईल.
- महिला आरक्षणाकरिता अर्ज केलेल्या विद्यार्थीनींनी महिला आरक्षणाचे सक्षम प्राधिकरणाचे (उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे) (Non- Creamy Layer) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- सर्व राखीव प्रवर्गाच्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा संबंधित उमेदवारास संबंधित आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. तसेच अशा विद्यार्थ्यांचा समावेश सर्वसाधारण प्रवर्गामध्ये होईल.
- एखादया प्रवर्गाचे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या प्रवर्गाची जागा आरक्षण धोरणानुसार पुढील प्रवर्गात परावर्तित होईल.
- PET- ८ लेखी परीक्षेचे संपादीत गुण व मौखिक परीक्षेचेगुण मिळून अतिंम गुणवत्तेनुसार प्रवेशाची प्रक्रीयाहोईल.
- पेट-८ च्या पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत CRC/DRC समितीचे निर्णय अंतिम राहतील.
- विद्यार्थ्यांनी कोविड-१९ बाबत शासनाने दिलेले सर्व नियम पाळूनच मौखिक परिक्षेस उपस्थित राहावे. ( उदा. मास्कचा वापर, सॅनिटायझर, सोशल डिस्टंनशींग